## नियमित दिवाणी मुकदमा क्र.४७३/२०२३ मधील निशाणी ५ वरील आदेश

## (आगतराव गावडे वि. आण्णा गावडे)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे कलम ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाईच्या आदेशासाठी केला आहे.

**मिळकतीचे वर्णनः–**

२. डिव्हीजन सोलापूर, सबडिव्हीजन व तालुका सांगोला पैकी मौजे जवळा येथील जमिन मिळकत –

| गट नंबर | क्षेत्र | | आकार | | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हे | आर | रु | पैसे | पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| २९८ | १-५७ | | १-२० | | रस्ता | वाकी घेरडी रस्ता | बाळा मारुती गावडे व संदीपान मारुती गावडे यांची मिळकत | आण्णा गावडे वगैरे यांची मिळकत |

(सदरची मिळकत ही वाद मिळकत असून त्यास यापुढे सोयीकरीता 'दावा मिळकत' असे संबोधले आहे. )

**वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

**३.** अर्जातील वादीचे कथन की, दावा मिळकत गट नं. २९८ ही यातील वादीची मिळकत असून सदरहू दावा मिळकतीचे उत्तरेस गट नं. २६१ प्रमाणे बाळा मारुती गावडे, संदीपान मारुती गावडे यांची मिळकत आहे. प्रतिवादींची मिळकत गट नं. २८४ असून सदर प्रतिवादींचे मिळकतीचे पश्चिमेस सर्वे नंबरचा दक्षिणोत्तर चालीचा रस्ता असून तो दक्षिणेकडे पुढे जवळा ते भोसे रस्त्यास जावून मिळतो. प्रतिवादींचे जमीनी लगतचे वहिवाटदार व प्रतिवादी हे पूर्वीपारपासून दक्षिणोत्तर चालीचे सर्वे नंबरचे रस्त्यावरुन पुढे जवळा– भोसे रस्त्यास जाऊन वहिवाट करीत आले आहेत. प्रतिवादींचा दावा मिळकतीतील वादींचे मालकी हक्कास व कब्जेवहिवाटीस हरकत अडथळे करणेचा कोणताही हक्क व अधिकार प्रतिवादींना नसताना त्यांनी वादींचे पिकपाण्याचे नुकसान होईल असे व हद्दीखुणा नष्ट होईल अशी कृत्ये करुन वादीचे दिवाणी हक्काचे नुकसान चालू केले आहे.

४. वादीची मिळकत गट नं. २९८ ही वाकी – घेरडी रस्त्यालगत पूर्वेस असल्याने वादी हे वाकीघेरडी रस्त्याने वहिवाट करीत आले आहेत. प्रतिवादींचे मिळकतीस पश्चिमेकडेलगत दक्षिणोत्तर चालीचा सर्वे नंबरचा रस्ता असून तो रस्ता पुढे

दक्षिणेस जाऊन जवळा भोसे रस्त्यास मिळतो. प्रतिवादी हे या रस्त्यावरुन पूर्वीपासून वहिवाट करीत आले आहेत. वादींचे मिळकतीत प्रतिवादींना व प्रतिवादींचे मिळकतीत वादींना काहीएक हक्क व अधिकार नव्हते व नाहीत. वादींचे दावा मिळकतीतील शांततापूर्ण कब्जेवहिवाटीस हरकत अडथळे करण्याचा अगर वादीचे दावा मिळकतीतील हद्दीखुणा नष्ट करणेचा प्रतिवादींना कोणताही हक्क व अधिकार नव्हता व नाही.

**५.** अशी परिस्थिती असताना दि.३०.०७.२०२३ रोजी व पुन्हा दि. ०६.०८.२०२३ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ४ हे दावा मिळकत गट नं. २९८ मध्ये आले व त्यांनी दावा मिळकतीतील दक्षिण बाजूस असणारा बांध फोडून दावा मिळकतीचे हद्दीखुणा नष्ट केले व दावा मिळकतीतील पिकांचे नुकसान केले. यावेळी वादींनी प्रतिवादींना दावा मिळकतीचे नुकसान करु नये अशी विनंती केली तेव्हा प्रतिवादींनी वादीचे दावा मिळकतीतून रस्ता करणार असलेचे सांगून दावा मिळकतीतील हद्दीखुणा नष्ट केल्या व पिकपाण्याचे नुकसान केले. प्रतिवादी हे दावा मिळकतीत अतिक्रमण करुन दावा मिळकतीचे हद्दीखुणा नष्ट करुन वादीच्या

शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत.

६. प्रतिवादींनी तहसिलदारसो सांगोला यांचेकडे रस्ता केस नं. ७/२०२० प्रमाणे रस्ता केस दाखल करुन त्यामध्ये खोटी माहिती देऊन त्या आधारे निकाल घेतला आहे. सदरहू निकालपत्रात मंजूर रस्ता नेमका किती फूटाचा आहे याबाबत काहीही रेकॉर्ड नाही तरीही प्रतिवादी हे तहसिलदार यांचा आदेशाचा गैरवापर करुन आदेशातील विषय सोडून आडदांडपणे व दंडेलशाहीने वादीचे दावा मिळकतीतील शांततापूर्ण कब्जेवहिवाटीस व पिकपाण्यास बेकायदेशीररित्या हरकत अडथळे करुन दावा मिळकतीतील हद्दीखुणा नष्ट करुन वादीचे नुकसान करत आहेत.

७. प्रस्तुतचा दावा चालून निकाल लागणेस बराचसा कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादींनी दावा मिळकतीतील वादींचे पिकांचे नुकसान करण्याचे कृत्य चालूच ठेवलेस व हद्दीखुणा नष्ट केलेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत दावा मिळकतीतील वादींचे पिकांचे  नुकसान करु नये तसेच दावा मिळकतीच्या हद्दीखुणा नष्ट करु नये व वादीच्या दावा मिळकतीतील शांततापूर्ण कब्जेवहिवाटीस बेकायदेशीरपणे हरकत

अडथळे करु नये, अशी प्रतिवादी यांना तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

८. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि.क्र.२९ कडे वादीच्या दाव्यास कैफियत व तुर्तातुर्त ताकीद अर्जास म्हणणे दिले की, वादीच्या दाव्यातील व तुर्तातुर्त ताकीद अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असून प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना मुळीच मान्य व कबूल नाही.

९. त्यांच्या पुढील कथनाप्रमाणे, वादी न्यायालयासमोर स्वच्छ हाताने दावा घेऊन आला नाही. प्रतिवादी यांनी तहसिलदार सांगोला यांचे न्यायालयात मामलेदार कोर्ट अॅक्ट कलम ५(२) प्रमाणे रस्ता केस दाखल केलेली होती. त्याचा निकाल प्रतिवादी यांच्या बाजूने झाला आहे. सदर मा. तहसिलदार सो यांचे आदेशाप्रमाणे सदर आदेशाची अंमलबजावणीसुध्दा संपूर्णपणे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन झाली आहे. त्यामुळे याच मुद्दयावर व याच वाद विषयावर पुन्हा नव्याने दावा दाखल करुन मोघम व खोटी विधाने करुन वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. वास्तविक मामलेदार कोर्ट कायदयाप्रमाणे मा. तहसिलदार हे सक्षम न्यायालय आहे व

या सक्षम न्यायालयाने एकदा निकाल दिल्यानंतर पुन्हा त्याच वाद विषयावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या न्यायालयायात दावा दाखल करुन दाद मागता येत नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास रेस ज्युडिकेटा या कायदेशीर तत्वाची बाधा आहे. मामलेदार सो यांनी मामलेदार कोर्ट अॅक्ट कलम ५(२) प्रमाणे केलेल्या आदेशावर यातील वादीने मा. प्रांत सो यांचे न्यायालयात अपील दाखल केले आहे. ते अपील अदयाप प्रलंबित आहे. ही सर्व बाब लपवून वादीने खोटया मजकूराचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी वादींना हरकत, अडथळे केले नाहीत व वादीच्या मिळकतीचे कोणतेही नुकसान कधीही केले नाही.

**१०.** मा. तहसिलदार यांच्या आदेशाची अंमलबजावणी झाली आहे व रस्ता खुला करण्यात आला आहे. सदर रस्त्याने प्रस्तुत प्रतिवादी व इतर शेतकरी ये–जा करत आहेत, ही बाब लपवून ठेवून वादीने खोटया मजकूराचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या जमिनीत सुधारणा करुन जमीन सुपीक व बागायती केली आहे. रस्त्याविना प्रतिवादी यांचे जमीनीचे नुकसान व्हावे व जमीनीची मशागत करता येऊ नये या वाईट हेतूने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा

दावा व तुर्तातुर्त ताकीद अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. तहसिलदार यांच्या न्यायनिर्णयाची अंमलबजावणी झाली असल्यामुळे प्रस्तुत दाव्यातील तुर्तातुर्त अर्ज इन्फ्रच्युअस झाला आहे. वादीस प्रायमा फेसी केस नसून न्यायाचा व दाव्याचा समतोल हा प्रतिवादीच्या बाजूने आहे. तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास या वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, तुर्तातुर्त ताकीद दिलेस या प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज रद्द करणेत यावा, अशी विनंती केली आहे.

**११.** प्रतिवादी क्र.४ यांनी नि.क्र.२१ कडे आपली कैफियत देऊन वादींचा दावा व तुर्तातुर्त ताकीद अर्जातील कथने मान्य केली आहेत.

**१२.** वादीतर्फे अॅड. ए.एस.पटेल यांचा युक्तीवाद ऐकला. वादींनी नि.क्र.३४ कडे लेखी युक्तिवाद दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ ते३ तर्फे एम.एस.इनामदार यांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रतिवादी यांनी नि.क्र.३६ कडे त्यांचा लेखी युक्तिवाद दाखल केला आहे.

**१३.** वादी–प्रतिवादी यांच्या कथनांवरुन माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित

झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रथमदर्शनी केस वादींच्या बाजूने आहे काय ? | नाही |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | नाही |
| ३ | सदरचा अर्ज नामंजूर केल्याने वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे का ? | नाही |
| ४ | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**१४.** वादीचा अर्ज वाचला. प्रतिवादींचे म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांच्याविरुध्द निरंतर ताकदीसाठी दाखल केला आहे. सदर दाव्याकामी वादी यांनी नि.क्र.५ कडे तुर्तातुर्त ताकीद अर्ज देऊन प्रतिवादी यांनी दावा मिळकतीच्या हद्दीखुणा नष्ट करु नये व दावा मिळकतीच्या शांततापूर्ण कब्जेवहिवाटीस बेकायदेशीरपणे हरकत, अडथळे करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद मागितलेली आहे.

**१५.** वादीने अभिलेखावर कागदोपत्री पुरावा म्हणून दावा मिळकत गट नं. २९८ व प्रतिवादी यांचा गट नं. २८४ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता त्यावर वादी क्र.१ यांचे नाव भोगवटदार सदरी दिसून येत आहे. वादीच्या तुर्तातुर्त ताकीद अर्जाचे स्वरुप पाहता प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील वादींचे पिकांचे नुकसान करु नये, तसेच दावा मिळकतीच्या हद्दीखुणा नष्ट करुन वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी दाद मागितल्याचे दिसून येते. त्याकरिता अभिलेख तपासला असता वादीने दावा कलम १ मधील मिळकतीच्या वर्णनामध्ये गट नं. २९८ च्या उत्तरेस आण्णा गावडे म्हणजेच प्रतिवादी क्र.१ यांची जमीन मिळकत असल्याचे कथन केले आहे. वादीने दावा कलम २ मध्ये दावा मिळकतीच्या उत्तरेस गट नं. २६१ प्रमाणे बाळा गावडे व संदिपान गावडे यांची मिळकत असल्याचे कथन केले आहे.

**१६.** वादीच्या कथनांवरुन दावा मिळकतीच्या नेमक्या कोणत्या बाजूस प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची गट नं. २८४ ची मिळकत आहे हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही. तुर्तातुर्त ताकीद अर्जातील मिळकतीच्या वर्णनावरुन दावा मिळकतीचे स्थान

निश्चित होत नाही. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ हे वादीचे लगत कब्जेदार आहेत किंवा नाही हे स्पष्ट होत नाही.

**१७.** प्रतिवादी यांनी नि.क्र. ३३, ३७ व ३९ कडे तहसिलदार सांगोला यांचेकडील रस्ता केस क्र. ०७/२०२० चे निकाला संदर्भात असलेले कागदपत्र दाखल केलेले आहेत. सदर निकालपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची मिळकत गट नं. २८४ साठी पूर्वीपासूनचा रस्ता जो गट नं. २९८, २९६ व २६१ च्या गटाच्या हद्दीवरुन पूर्व–पश्चिम चालीचा असा रस्ता खुला करुन मागितला आहे. त्याप्रमाणे तहसिलदार यांनी अर्ज मंजूर करुन गट नं. २९८, २९६ व २६१ मधील प्रतिवादी क्र.१ यांचे रस्त्यास होणारा अडथळा दूर केलेला आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी दि. २६.१०.२०२१ रोजी रस्ता खुला करुन त्याची अंमलबजावणी केल्याचे नि.क्र. ३३/२ कडील कागदपत्रांवरुन दिसून येते. त्याबाबतचा प्रतिवादी क्र.१ यांचा जबाब प्रतिवादींनी नि.क्र.३३/३ कडे दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी नि.क्र.३८/५ कडे गट नं. २६१, २९६ व २९८ चा कच्चा हातनकाशा जोडला आहे. परंतु, त्यामध्ये देखील वादीचे क्षेत्र नेमके कोणत्या दिशेस

आहे हे नमूद नाही. त्यामुळे त्यावरुन दावा मिळकतीचे स्थान स्पष्ट होत नाही.

**१८.** वादीने दि. ३०.०७.२०२३ व दि. ०६.०८.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांना हरकत अडथळा केला आहे असे नमूद केले आहे. परंतु, त्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रतिवादींनी दावा मिळकतींच्या हद्दीखुणा नष्ट केल्या बाबतचा देखील पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. वादींनी दावा मिळकतीबाबतचा नकाशा अभिलेखावर दाखल केलेला नाही. वादींनी प्रतिवादी क्र. १ ते ३ हे त्यांचे लगत कब्जेदार आहेत हे शाबित केलेले नाही. त्यांनी नेमका कसा हरकत अडथळा केला हे प्रथमदर्शनी शाबित केलेले नाही. याऊलट, गट नं. २८४ चे ७ x १२ उता-याचे अवलोकन केले असता त्यावर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची नोंद देखील नमूद नाही. प्रतिवादी क्र. १ यांचे नावास कंस करुन प्रतिवादी क्र.४ यांचे नाव नमूद आहे. प्रतिवादी क्र.४ यांच्याविरुध्द वादीची स्पष्टपणे कोणतीही मागणी नाही, असे दिसून येते. प्रतिवादी क्र.४ यांनी नि.क्र.२१ प्रमाणे दावा मान्य केलेला आहे.

**१९.** अभिलेखावरुन उभयपक्षामध्ये हद्दीखुणांवरुन वाद असल्याचे दिसून

येते. परंतु, वादीने दावा मिळकतीचे निश्चितपणे ठिकाण कोठे आहे, याबाबत अभिलेखावर संदिग्धता ठेवली आहे. अशा परिस्थितीमध्ये वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र नाही. वादी यांनी प्रथमदर्शनी केस शाबित केलेली नाही. अभिलेखावरील विसंगत कथनांवरुन वादी यांचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे दिसून येत नाही. दाव्याचा समतोल देखील वादीच्या बाजूने नाही. सबब, अर्ज नामंजूर करणे योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देते व मुद्दा क्र. ४ साठी खालील आदेश पारित करते.

**आदेश**

१. अर्ज (निशाणी ५) नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च वादी व प्रतिवादी यांनी आपापला सोसणेचा आहे.

KANCHAN BABASAHEB SONAWANE Digitally signed by KANCHAN BABASAHEB SONAWANE Date: 2025.02.17 17:26:46 +0530

सांगोला. (के.बी.सोनवणे)

दिनांक – १७/०२/२०२५. २रे.सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.S.Kolekar |
| (b) | Court | : | Mrs. K.B.Sonawane,<br>2nd Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 15.02.2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 15.02.2025 |